# नागरिकांची सनद

## महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई

### प्रस्तावना

भारत हा विविध धर्म, जाती,जमाती व अनेक भाषांचा देश आहे. समाजातील विविधता व सर्व जाती, जमातींची सांस्कृतिक परंपरा कायम ठेवण्याकरिता सर्व नागरिकांना संरक्षण देणे आवश्यक आहे. तसेच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी अनुकूल धोरण व कार्यक्रम ठरविणे गरजेचे आहे.

भारताच्या संविधानामध्ये धार्मिक अल्पसंख्याकांसाठी खालीलप्रमाणे संरक्षक उपाययोजनांची तरतूद करण्यात आली आहे.

अनुच्छेद २५ - व्यवसाय, व्यवहार आणि धार्मिक प्रसार करण्याचे स्वातंत्र्य.

अनुच्छेद २६ - धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य.

अनुच्छेद २८ - विवक्षित शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण अथा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य.

अनुच्छेद २९ - अल्पसंख्याक समाजाच्या हितसंबंधांचे संरक्षण.

अनुच्छेद ३० - अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक संस्था स्थापन्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचे अधिकार.

**राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग, अधिनियम, २००४** अन्वये राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक **संस्थांना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान** करण्यासाठी राज्य शासनाने **अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांना सक्षम प्राधिकारी** म्हणून घोषित केले आहे.

- **दि. १७ फेब्रुवारी, १९९२** रोजी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची धोरणात्मक निर्णयाद्वारे तीन वर्षांकरिता प्रथम स्थापना करण्यात आली होती.
- **दि. २१ जून, १९९५** रोजी राज्य अल्पसंख्याक आयोगाची ३ वर्षांची मुदत संपली.
- तद्नंतर राज्यातील धार्मिक अल्पसंख्याकांच्या हितांचे संरक्षण व भारताच्या संविधानामध्ये अल्पसंख्याकांसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याकरिता राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या धर्तीवर शासन निर्णय क्र. एलएमएन/ प्र.क्र.-४९/३५, **दि. ४.२.२०००** अन्वये राज्य अल्पसंख्याक आयोगाची पुनर्स्थापना करण्यात आली.
- **दि. १५ जुलै, २०००** च्या शासन निर्णयानुसार तीन वर्षांकरिता श्री. मोहम्मद अमीन खंडवाणी यांची आयोगाच्या अध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली.
- **दि. ९ नोव्हेंबर, २०००** च्या अधिसूचनेनुसार राज्य अल्पसंख्याक आयोगावर ७ सदस्यांची तीन वर्षांकरिता नियुक्ती करण्यात आली.
- तीन वर्षांच्या कालावधीसाठी राज्य शासनाने पुनर्घटित केलेल्या राज्य अल्पसंख्याक आयोगाची मुदत **दि.३ फेब्रुवारी २००३** रोजी समाप्त झाली.
- शासन निर्णय क्रमांक एलएमएन १०९९/सीआर ३९/९९/३५, **दि.३१ मार्च २००३** अन्वये आयोगास **दि.४फेब्रवारी २००३** पासून पुढे दोन वर्षांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली.
- महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम २००४ (सन २००५ चा अधिनियम क्र.३१) **दिनांक ८ ऑगस्ट २००५** च्या शासन अधिसूचनेन्वये आयोगास सांविधानिक दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

- शासन अधिसूचना क्र. राअआ-२००५/८९/प्र.क्र.१९/२००५/३५, **दिनांक ४ ऑगस्ट २००६** अन्वये राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्ष पदी श्री.मोहम्मद नसीम सिद्यीकी यांची आणि उपाध्यक्ष पदी डॉ. अब्राहम मथाई यांची पाच वर्षांकरिता नियुक्ती करण्यात आली.
- शासन अधिसूचना क्र. राअआ/२००८/विकाक.११२/प्र.क्र.२६३/०८/का.१, **दि. ३० जुलै, २००९** अन्वये पारसी समाजाचे प्रतिनिधी म्हणून श्री. दिनशॉ रुसी मेहता यांची पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून ५ वर्षांच्या कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## २. आयोगाची रचना

**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची रचना खालीलप्रमाणे आहे.**

**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग**

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | अशासकीय सदस्य (नऊ) | सदस्य सचिव |

आयोगाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून आयोगाचे **कार्यालय बद्रुद्दीन तय्यबजी मार्ग, सी.एस.टी. जवळ, मुंबई ४०० ००१** येथे आहे.

**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम २००४ (सन २००५ चा अधिनियम क्र.३१) च्या कलम १० अन्वये आयोगाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे :-**

१ ) अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी भारताच्या संविधानामध्ये आणिराज्य विधान मंडळाने मंजूर केलेल्या कायद्यांमध्ये तरतूद करण्यात आलेल्या विविध संरक्षक उपाययोजनांच्या कार्यक्षमतेची तपासणी करणे ;

२) सर्व संरक्षक उपाययोजनांचे प्रभावी कार्यान्वयन व अंमलबजावणी होण्याची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने शिफारशी करणे;

३) संविधान आणि संसदेने आणि राज्य विधानमंडळाने अधिनियमित केलेले कायदे यात तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजना आणि अल्पसंख्याकांसाठी असलेली राज्य शासनाची धोरणे आणि योजना यांच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवणे.

४) अल्पसंख्याकांच्या बाबतीत होणारा भेदभाव टाळण्याच्या प्रश्नांबाबत अभ्यास, संशोधन, विकास व विश्लेषण करणे.

५) शासन, शासकीय उपक्रम, निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या सेवेतील अल्पसंख्याकाच्या प्रतिनिधीत्वाचे वास्तविक निर्धारण करणे आणि प्रतिनिधीत्व अपुरे असल्यास त्याबाबतीत इच्छित पातळी गाठण्यासाठी उपाय सुचविणे.

६) राज्यात जातीय ऐक्याची सुनिश्चिती करण्यासाठी, ते राखण्यासाठी आणि त्याला उत्तेजन देण्यासाठी शिफारशी करणे.

७) शासनाला विहित कालांतराने नियतकालिक अहवाल सादर करणे.

८) अल्पसंख्याकांचे कल्याण आणि विकास यांच्या दृष्टीने, आयोगाच्या मते महत्वाची असेल, अशा इतर कोणत्याही बाबीचा अभ्यास करणे आणि समुचित शिफारशी करणे.

९) अल्पसंख्याकांच्या गा-हाण्यांचा विचार करणे आणि त्यावर वेळोवेळी यथोचित उपाय सूचविणे.

१०) अल्पसंख्याकांना अधिकार व संरक्षक उपाययोजना यापासून वंचित ठेवण्यासंबंधातील विनिर्दिष्ट तक्रारींमध्ये लक्ष घालणे आणि अशा बाबी समुचित प्राधिकरणाकडे नेणे.

११) अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी असलेल्या पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे समन्वयन व पर्यवेक्षण करणे.

- राज्य शासनाच्या अधिसूचना क्रमांक राअआ २००५/८९/प्र.क्र.१९/२००५, दि.९ नोव्हेंबर २००६ अन्वये खालील समुदायांना अल्पसंख्याक म्हणून घोषित करण्यात आले आहे.

  १) मुस्लिम
  २) ख्रिश्चन
  ३) शीख
  ४) बौध्द
  ५) पारशी
  ६) जैन

**कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक **परिशिष्ट-२** मध्ये दिल्यानुसार राहील.

**नियम/शासन निर्णय**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाशी संबंधित नियम अथवा महत्वाचे शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. निर्गमित होणाऱ्या नियम तथा शासन निर्णयांबाबतची माहिती www.mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अद्यायावत करण्यात येते.

**गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निवारण**

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी **परिशिष्ट -२** मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून विहित कालावधीमध्ये त्याची पूर्तता करण्याची

जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील. यानंतरही नागरिकांचे समाधान न झाल्यास संबंधित अध्यक्ष/सचिव यांच्याकडे याबाबत त्यांना तक्रार करता येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने तथा ई-मेलद्वारे मांडता येईल.

**नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन**

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा अल्पसंख्याक आयोगाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

**जनसामान्यांकडून सूचना**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली राहील व नागरिकांच्या सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. अल्पसंख्याक आयोगाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपल्या हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी सनदेची मदत होईल.

**नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबद्ध आहे. अल्पसंख्याक आयोग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरवितांना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची राहील.

----------------

## परिशिष्ट-२

## आयोगाकडून पुरविण्यात येणा-या सेवेचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | राज्यातील अल्पसंख्याक समाजांच्या व्यक्तींकडून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयास प्राप्त होणा-या निवेदनांवर संबंधित कार्यालयाकडून अहवाल मागवून कार्यवाही करण्यात येते.<br>महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास प्राप्त होणा-या अन्याया संदर्भातील किंवा भेदभावपूर्ण वागणूकी संदर्भातील तक्रारींबाबत आयोगाकडून चौकशी/ सुनावणी आयोजित करण्यात येतात.<br>राज्यातील कोणत्याही व्यक्ती अथवा संघटना, यांनी अल्पसंख्याकाच्या हक्कासंबंधीचे निवेदन व्यक्तिशः, संघटनेमार्फत किंवा टपालाने साध्या कोऱ्या कागदावर पुर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक नमूद केलेले, राज्य अल्पसंख्याक आयोगास सादर केल्यास ते स्विकारले जाईल. अर्जदाराच्या अर्जावर/ तक्रारीवर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही. अथवा कोर्ट फी स्टॅम्प लावण्याची गरज नाही. | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग<br>दुरध्वनी क्र.<br>२२६१ ०१५६<br>२२६५ ००८५ | ३ महिने | अध्यक्ष,<br>महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग.<br>दूरध्वनी क्र.<br>२२६१ ०१५६<br>२२६५ ००८५ |
| २ | **अल्पसंख्याक समाजाकरिता हेल्पलाईन :-** शासनाने अल्पसंख्याक समूह म्हणून घोषित केलेल्या मुस्लिम,ख्रिश्चन,बौद्ध, पारसी, शीख आणि जैन समाजाच्या लोकांना शासकीय कामकाजाबाबत वेळोवेळी उद्‌भवणा-या अडचणींबाबत मार्गदर्शन व राज्य शासनाने राज्यातील अल्पसंख्याक समाजासाठी सुरु केलेल्या विविध योजनांबाबत संबंधित लोकांच्या शंकेचे निरसन करण्यासाठी हेल्पलाईनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. | नांव दर्शना ऊरणकर<br>महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग<br>दूरध्वनी क्र.<br>२२६१ ०१५६<br>२२६५ ००८५ | तात्काळ | सचिव,<br>महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग.<br>दूरध्वनी क्र.<br>२२६१ ०१५६<br>२२६५००८५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | **पोलिस शिपाई भरती पूर्व परिक्षा प्रशिक्षण वर्ग :-**<br>राज्यातील पोलिस दलात अल्पसंख्याकांचे योग्य त्या प्रमाणात प्रतिनिधित्व वाढविण्यासाठी राज्य अल्पसंख्याक आयोगातर्फे प्रत्येक जिल्हयात शैक्षणिक संस्था किंवा नोंदणीकृत सेवाभावी संस्थांमार्फत पोलिस भरती पूर्व परिक्षा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येतात. ही योजना सर्व जिल्हयांमध्ये जिल्हाधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येते.<br>जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सदर प्रशिक्षण कार्यक्रम खालीलप्रमाणे राबविण्यात येतो.<br>सदर योजनेंतर्गत इच्छूक प्रशिक्षण संस्थांकडून अर्ज मागविण्यासाठी राज्यपातळीवरुन जाहिरात देण्यात येते आणि अर्ज संबंधित जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयामध्ये सादर करण्यात येतात. संस्थेची अंतिम निवड महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडून करण्यात येते.<br>जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षण देण्यासाठी इच्छूक संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर सदर प्रस्तावांची छाननी आणि स्थळ पाहणी करुन जिल्हाधिकारी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या मान्यतेसाठी सदर प्रस्ताव पाठविण्यात येतात.<br>जिल्हाधिकारी यांनी विहित केलेल्या प्रमाणात प्रशिक्षणासाठी अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांची निवड करुन गुणानुक्रमानुसार १०० उमेदवारांची यादी संस्थेस पुरवितात. तसेच किमान २५ उमेदवारांची प्रतिक्षा यादी देखील तयार करुन ठेवली जाते.<br>जिल्हाधिकारी संबंधित पोलीस आयुक्त/ जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या मदतीने प्रशिक्षण संस्थेस प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम आणि वेळापत्रक ठरवून देतात.<br>प्रशिक्षणार्थींची शारिरिक क्षमता तपासून निवड करण्याचे काम संबंधित जिल्हाधिकारी हे पोलिस आयुक्त/ जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्याशी समन्वय साधून करतात.<br>उमेदवारांची निवड करण्यासाठी राज्यस्तरावरुन जाहिरात प्रसिध्द येते. त्यानुसार सर्व जिल्हयांमध्ये एकाच दिवशी उमेदवारांची निवड करण्यात येते. | संबंधित जिल्हयांचे जिल्हाधिकारी | पुर्वनियोजित कार्यक्रमानुसार २ महिन्यांचे प्रशिक्षण | सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग. दूरध्वनी क्र. २२६१ ०१५१ २२६५ ००८५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | **राज्य व नागरी सेवा परिक्षा मार्गदर्शन केंद्र :-** संघ लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणा-या स्पर्धा परिक्षांकरिता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंख्याक उमेदवारांसाठी विभागवार स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरुं करण्यात आली आहेत. सध्या सदर योजना राज्य प्रशासकीय सेवा प्रशिक्षण संस्था मुंबई/ कोल्हापूर/ औरंगाबाद/ नागपूर तसेच यशदा, पुणे यांचेमार्फत राबविण्यात येत असून या प्रत्येक केंद्रामध्ये १० अल्पसंख्याक उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. | संचालक, राज्य प्रशासकीय सेवा प्रशिक्षण संस्था आणि संचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे | १ एप्रिल ते ३१ मार्च | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग. दूरध्वनी क्र. २२६१ ०१५६ २२६५ ००८५ |
| ५ | **मराठी भाषा फौंडेशन वर्ग कार्यक्रम :-** स्पर्धा परिक्षेमध्ये अल्पसंख्याक उमदेवार मराठी भाषेमध्ये मागे पडतात. यासाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मराठी भाषेवर प्रभुत्व प्राप्त व्हावे व त्यांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी अमराठी भाषिक माध्यमिक विद्यालयांमध्ये शिकणाऱ्या ८ वी, ९ वी आणि १० वीच्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेचे फौंडेशन वर्ग सुरु करण्यास शासनाने सप्टेंबर, २००६ पासून मान्यता दिली आहे. सदर योजना सर्व जिल्हयांमध्ये सुरुं असून सदरील वर्गामध्ये शिकविणा-या मानसेवी शिक्षकांना दरमहा रु.३०००/- एवढे मानधन देण्यात येते. | संबंधित जिल्हयांचे जिल्हाधिकारी | १ एप्रिल ते ३१ मार्च | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग. दूरध्वनी क्र. २२६१ ०१५६ २२६५ ००८५ |